# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 16 February 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- भारत टेक्स २०२५ या वस्त्रोद्योग मेळाव्यात महाराष्ट्रासोबत ३८० कोटी रुपयांचे सामंजस्य करार
- बेकायदा धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधातल्या नव्या कायद्याच्या तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी सात सदस्यीय समिती स्थापन
- सीबीएसईच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांना सुरुवात
- दिल्ली रेल्वे स्थानकात काल रात्री झालेल्या चेंगराचेंगरीत १५ जणांचा मृत्यू

आणि

- ४४ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचं डॉ भीमराव वाघचौरे यांच्या हस्ते उद्घाटन

****

दिल्लीत सुरू असलेल्या भारत टेक्स २०२५ या वस्त्रोद्योग मेळाव्यात महाराष्ट्रासोबत ३८० कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले आहेत. राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी ही माहिती दिली. या करारामधून राज्यात दोन हजार पेक्षा अधिक लोकांना रोजगार उपलब्ध होणार असल्याचं सावकारे यांनी सांगितलं.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आज या मेळाव्याला संबोधित करणार आहेत. या मेळाव्याचा आज समारोप होत असून, त्यात १२० देशातून आलेले प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

****

बेकायदा धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधातल्या नव्या कायद्याच्या कायदेशीर तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीत महिला आणि बालकल्याण विभाग, अल्पसंख्याक व्यवहार विभाग, विधी आणि न्याय विभाग, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांचे सचिव तसंच गृह विभागाच्या उपसचिवांचा समावेश आहे.

ही समिती बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विषयी राज्यातल्या सद्यस्थितीचा अभ्यास करेल, आणि यासंदर्भातल्या तक्रारींवरील कार्यवाहीसाठीच्या उपाययोजना सुचवणार आहे.

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ – सीबीएसईच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांना कालपासून प्रारंभ झाला. देशातल्या सात हजार ८४२, तर परदेशातल्या २६ केंद्रांवर या परीक्षा होत आहेत. दहावीच्या परीक्षा १८ मार्च, तर बारावीच्या परीक्षा चार एप्रिल रोजी संपणार आहेत.

दरम्यान, विद्यार्थ्यांना परीक्षांमुळे येणाऱ्या तणावाच्या व्यवस्थापनात मदत करण्यासाठी सीबीएसईने समुपदेशन सेवाही सुरू केली आहे. सोमवार ते शनिवार सकाळी साडेनऊ ते संध्याकाळी साडेपाच या वेळात ही सेवा उपलब्ध असेल.

****

पर्यटकांना जगभर फिरवून आणणारे केसरी टुर्सचे संचालक केसरी पाटील यांचं काल सकाळी मुंबईत वार्धक्यानं निधन झालं, ते ९० वर्षांचे होते. काल संध्याकाळी त्यांच्या पार्थिव देहावर शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी केसरी पाटील यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

****

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आपलं नियोजित साखळी उपोषण पुढे ढकललं आहे. शासनाने आपल्या चार मागण्यांपैकी दोन मागण्यांबाबत निर्णय घेतला आहे, उर्वरित दोन मागण्यांबाबत निर्णय घेण्यासाठी पंधरा दिवसाचा वेळ देत असल्याचं जरांगे यांनी सांगितलं. मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास पुन्हा उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

****

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती म्हणूनच लढणार आहोत, तथापि, काही निर्णय स्थानिक परिस्थिती पाहून घेतले जातील, असं भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं माध्यमाशी बोलत होते. नेत्यांमध्ये मतभेद असू शकतात मनभेद असता कामा नये, असं मतही बावनकुळे यांनी व्यक्त केलं.

****

दिल्ली रेल्वे स्थानकात काल रात्री झालेल्या चेंगराचेंगरीत १५ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. फलाट क्रमांक १४ आणि १५ वर प्रयागराज इथं महाकुंभमेळ्याला जाणार्या रेल्वेसाठी अचानक गर्दी झाल्यानं, ही चेंगराचेंगरी झाल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. जखमींवर उपचार सुरु असून बचाव आणि मदकार्य सुरु आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. मृत नागरीकांच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त करत असून, जखमी लवकर बरे होण्याची प्रार्थना करत असल्याचं, त्यांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर नजीक वाळूज इथं ४४ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचं उद्घाटन काल संमेलनाध्यक्ष डॉ भीमराव वाघचौरे यांच्या हस्ते झालं. ललित साहित्य निर्मितीमागे त्या त्या लेखाची अनुभवव्याप्ती असावी लागते, तरच ती साहित्यकृती वास्तववादी आणि वाचनीय ठरते, असं मत वाघचौरे यांनी व्यक्त केलं. ते म्हणाले…

> **अधिकतर साहित्यकृतीच्या निर्मितीतून तिच्या पाठिमागून अपरिहार्यपणे, अस्पष्टपणे लेखक डोकावत असतो. कारण त्याशिवाय त्या–त्या साहित्यकृतीची निर्मिती ही प्रखर वास्तवाच्या अंगाने होत नाही. एकूणच ललित साहित्य निर्मितीच्या प्रक्रियेमागे त्या–त्या लेखकाचा अनुभव असावा लागतो, तरच ती साहित्यकृती वास्तववादी आणि वाचनीय ठरते. निदान माझी तरी अशी धारणा आहे.**

पालकमंत्री संजय शिरसाट, मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, स्वागताध्यक्ष विजय राऊत, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

तत्पूर्वी, दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात उभारलेल्या विलासराव देशमुख साहित्य नगरीतून निघालेल्या ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात झाली. मसिआचे अधक्ष चेतन राऊत यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना अभिवादन करून ग्रंथदिंडीचं उद्घाटन करण्यात आलं. लाठी काठी फिरवण्याचं प्रात्यक्षिक तसंच भारूड आणि देशभक्तीपर गीतं सादर करून या कलाकारांनी नागरिकांचं लक्ष वेधून घेतलं.

या संमेलनात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून, संमेलनाचा आज समारोप होत आहे.

****

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या शिवाजीनगर भुयारी बोगद्याचं पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते काल लोकार्पण करण्यात आलं. यावेळी मंत्री अतुल सावे तसंच खासदार संदिपान भुमरे उपस्थित होते. हा भुयारी मार्ग सुरू झाल्यामुळे गेल्या

दोन वर्षापासून या भागात होणारी वाहतूक कोंडी आणि अपघाताची मालिकाही थांबेल, अशी अपेक्षा मराठवाडा रेल्वे कृती समितीचे अध्यक्ष अनंत बोरकर यांनी व्यक्त केली.

****

आय सी सी च्या एकदिवसीय क्रिकेट चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी रोहित शर्माच्या नेतृत्वातला भारतीय क्रिकेट संघ काल दुबईला रवाना झाला. या स्पर्धेत भारताचा समावेश अ गटात असून, २० फेब्रुवारीला भारताचा सलामीचा सामना बांगलादेश विरोधात होणार आहे.

****

जालना इथं सुरू असलेल्या विभागीय महसूल आणि क्रीडा स्पर्धेत परभणी पुरुष क्रिकेट संघाने बीड संघाला हरवत विजेतेपद पटकावलं. परभणी पुरुष क्रिकेट संघाने सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपदाचा मान पटकावला आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात लोहारा तालुक्यातल्या धानुरी इथं महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान अर्थात – उमेदच्या सहकार्यातून अंबिका महिला बचत गटाने गो– संवर्धनातून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल केली आहे. या बचतगटाने गोमूत्र आणि शेणांच्या गोवऱ्यापासून दंतमंजन करण्याचा व्यवसाय सुरु केला आहे. याशिवाय पंचगव्यापासून अमृतधारा नावाचं गुणकारी तेल, पंचगव्य बाम, पंचगव्य साबण यासारखी उत्पादनं तयार केली आहेत. बचत गटाच्या महिलांनी याबाबत अधिक माहिती दिली..

***नमस्कार. माझे नाव पुष्पावती लक्ष्मण बाबर. मी दंत्तमंजन घेतलेलं आहे. आणि सेंद्रीय खताची शेती केलेली आहे. गोमुत्र आम्ही फवारणीसाठी वापर करतो. म्हणून आमचं पीकपाणी, उत्पन्न वाढतंय.***
***नमस्कार. माझे नाव वैशाली साळुंखे. मी धानोरीमध्ये २०२० पासून सी आर पी म्हणून काम करत आहे. यांना आम्ही प्रोत्साहन केले की त्यांच्याकडे देशी गाई आहेत. त्यांनी म्हणले प्रॉडक्ट आम्ही बनवू शकतो, पण प्रॉडक्ट***

***बनवण्यासाठी पैसा नाही. मग आम्ही अंतर्गत कर्ज दिलं. बँकेचं कर्ज मिळवून दिलंय. ग्रामसंघातून, सी आय एफच्या माध्यमातून त्यांना प्रोत्साहन केलं की तुम्ही प्रॉडक्ट तयार करा.***

****

हिंगोली शहरात छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा परिसरात शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने शिवकालीन आणि ऐतिहासिक नाण्यांचं प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. या प्रदर्शनात देशविदेशातल्या नाणी, नोटांचं प्रदर्शन आणि त्यांचा इतिहास मांडण्यात आला असून, वैभव कोटकर या युवकाने दहा वर्षापासून या नाण्यांचं आणि नोटांचं संकलन केलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर इथं पोलिसांनी एमडी हा अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या तीन जणांना अटक केली आहे. या कारवाईत अंमली पदार्थाच्या ५९ पुड्यांसह एक वाहन आणि मोबाईल असा एकूण दहा लाख ७५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

****

संत सेवालाल महाराजांचा २८६ वा जन्मसोहळा काल सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाशिम जिल्ह्यातल्या पोहरादेवी इथं आठवडाभरापासून श्रीमद् भागवत सप्ताह, ग्रंथ लिलामृत कथा, कलश पालखी सोहळा, शोभायात्रा मिरवणुक, भजन, कीर्तन आदीसह विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त हिंगोली इथं काल आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर घेण्यात आलं. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

****